## – सत्र खटला क्र.१३/२०२१ मधील नि.क्र.१४८ वरील आदेश –

(घोषित दि. २०/०६/२०२३)

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र .७ राजन श्रीधर परब यांनी त्यांचा पासपोर्ट क्र . J5462865 पुढील दहा वर्षाकरिता नुतनीकरण करुन मिळणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. आरोपी यांचे असे म्हणणे आहे की , ते कायमस्वरुपी गांव मौजे कणकवली बिजलीनगर ता. कणकवली, जि.सिंधुदुर्ग येथे राहतात. तसेच त्यांची तेथे स्थावर व जंगम मालमत्ता असून ते महाराष्ट्र राज्यात स्थायिक आहेत . त्यांचेविरुध्द भा.द.वि.कलम ३५३,३३२,३४२,३२४,१४७,१४३,१४८,१४९,३२३, ५०४, ५०६,१०९,१२०–बी, तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल असून त्याबाबतचा खटला या न्यायालयात प्रलंबित आहे. आरोपी क्र. ७ यांनी पासपोर्ट कार्यालयात पासपोर्ट नुतनीकरण करुन मिळणेसाठी चौकशी केली असता त्यांना न्यायालयाचे योग्य ते आदेश आवश्यक असल्याचे सांगणेत आले. त्यामुळे मे. न्यायालयात सदरचा खटला प्रलंबित असल्याने मे. न्यायालयाकडून पासपोर्टचे नुतनीकरण करणेसाठी आवश्क ती परवानगी मिळणे आवश्यक आहे. आरोपी यांचे पुढे असेही कथन आहे की, आरोपी पासपोर्टचे आधारे परदेशात गेले तरी प्रस्तुत खटल्याचे कामकाजामध्ये कोणताही स्वरुपाचा खंड पडणार नाही याची दक्षता घेण्यास तयार आहेत . पासपोर्टचे नुतनीकरण झाल्यावर त्याचा दुरुपयोग करणार नाहीत अथवा कोठेही पळून जाणार नाहीत. तसेच न्यायालय आदेश करेल त्यावेळी न्यायालयात हजर राहण्यास तयार आहेत अशी हमी देत आहेत. त्यामुळे आरोपी यांना पासपोर्टचे नुतनीकरण करुन मिळणेस परवानगी देणेत यावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर विशेष सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल करुन आरोपीने सदर अर्ज कोणत्या कायदेशीर तरतुदीखाली दाखल करणेत येतो याबाबत तरतुद

नमूद करणेत यावी असे म्हटले आहे. तसेच अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रस्तुत आरोपीकडून जामीन व हमीपत्र घेणेत यावी हे म्हटले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा खटला हा सन २०२१ मधील आहे. सदरचा खटला पुरावा देणेवर प्रलंबित आहे . परंतु, आरोपी यांना केवळ पासपोर्ट काढून मिळणेसाठी अथवा त्याचे नुतनीकरण करणेसाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक नाही . खटल्याचे अवलोकन करता आरोपी हे जाणीवपुर्वक न्यायालयात गैरहजर राहून खटल्याच्या कामकाजास विलंब करीत आहेत असे दिसत नाही. आरोपींनी त्यांच्या अर्जातच प्रस्तुत खटल्याचे कामकाजात कोणत्याही प्रकारचा खंड पडणार नाही याची दक्षता घेण्यास ते तयार आहेत असे म्हटलेले आहे. त्यामुळे त्यांचे स्वतंत्र हमीपत्र घेणे आवश्यक वाटत नाही. सबब, आरोपी यांना पासपोर्ट देणे अथवा त्याचे नुतनीकरण करणेस न्यायालयाची हरकत नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणेस कोणतीही कायदेशीर अडचण नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## – आदेश –

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. आरोपी क्र.७ श्री. राजन श्रीधर परब यांना त्यांचा पासपोर्ट क्र. J5462865 पुढील दहा वर्षाकरिता त्याचे नुतनीकरण करणेस परवानगी देण्यात येत आहे.

SANIKA SATISH JOSHI
Digitally signed by SANIKA SATISH JOSHI
Date: 2023.06.23 15:17:57 +0530

दिनांक –२०/०६/२०२३ (श्रीमती सानिका एस.जोशी)
सिंधुदुर्ग – ओरोस. सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.